# विभागीय आयुक्त कार्यालय,
# (विधानभवन) पुणे विभाग, पूणे

(नगरपरिषद प्रशासन शाखा)

दुरध्वनी क्र :- ०२०-२६३६२३३१
फॅक्स :- ०२०-२६३४३२३३

वेब साईट:- divcompune.in
ई मेल-rdmapune@gmail.com

क्रमांक :-न.पा./नमामि/१०८/२०१८ दिनांक :- ०७ /०७/२०१८

**विषय - नमामि चंद्रभागा प्राधिकरण**
**प्राधिकरणाअंतर्गत राबवावयाच्या विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प व्यवस्थापक तथा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणेकरीता इच्छुंकाचे प्रस्ताव मागणीच्या मसुदा (Request for Proposal-RFP) छाननी करणे व निविदांकरीता तांत्रिक सल्लागार समिती (Technical Advisory Committee) नियुक्त करणेबाबत.............**

**वाचा** - मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली नमामि चंद्रभागा प्राधिकरणाअंतर्गतनमामि चंद्रभागा प्राधिकरणाअंतर्गत शक्ति प्रदत्त समितीच्या दि. १५ फ़ेब्रुवारी २०१८ रोजी झालेल्या पहिल्या बैटकीचे कार्यवृत्त

## आदेश

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली नमामि चंद्रभागा प्राधिकरणाअंतर्गत शक्ति प्रदत्त समितीच्या दि. १५ फ़ेब्रुवारी २०१८ रोजी झालेल्या पहिल्या बैटकीमध्ये प्राधिकरणाअंतर्गत गटीत करण्यात आलेल्या प्रकल्प संनियंत्रण समितीने स्थानिक स्वराज्य (शहरी व ग्रामिण) संस्थांमधील प्रकल्पांच्या कामांच्या संनियंत्रणासाठी कक्ष उभारणे तसेच प्रशासकीय व कार्यालयीन खर्चाकरीता उपलब्ध होणा-या निधीमधून २ टक्के इतका निधी विनीयोग करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

या अनूषंगाने दि. २६ जुन २०१८ रोजी झालेल्या प्रकल्प संनियंत्रण समितीच्या दुस-या बैटकीमध्ये भीमा नदी व उपनद्यांच्या काठांवर असलेल्या नगरपरिषदा, नगरपंचायती तसेच गावांमध्ये प्राधिकरणाअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तसेच सांडपाणी व्यवस्थापनाचे प्रकल्प राबविण्याबाबत प्रकल्प व्यवस्थापक तथा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणेबाबत कार्यवाही करण्यासंदर्भात विचारविनीमय करण्यात आला. त्यानूसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराकरीता इच्छुकांकडून निविदा मागविणेकरीता प्रस्ताव (RFP) तयार करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावाचा मसुदा अंतिम करणे तसेच या अनूषंगाने मागविण्यात येणा-या

निविदांची छाननी करून निर्णयास्तव शिफ़ारस करणेकरीता आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली एक तांत्रिक सल्लागार समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील.

१) आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - **अध्यक्ष**
२) डॉ. राजेश बिनीवाले, Senior Principal Scientist & Head, CTMD, NEERI, Nagpur - **सदस्य**
३) संचालक, कॉलेज ऑफ़ इंजिनिअरींग, पुणे (CoEP) यांनी प्राधिकृत केलेले - **सदस्य**
४) श्री. प्रविण कोल्हे, अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ (प्रकल्प), पुणे - **सदस्य**
५) श्री. हेरंबप्रसाद गंधे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ - **सदस्य**
६) श्री. प्रशांत खांडकेकर, प्रादेशिक उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन शाखा - **सदस्य सचिव**
७) अध्यक्षांच्या मान्यतेने निमंत्रित सदस्य

सदस्य सचिव यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी उक्त तपासणी समितीच्या गठनाबाबत सर्व सदस्यांना अवगत करून समितीची बैठक आयोजित करणे, समितीच्या कामकाजासंदर्भात समितीच्या सदस्यांशी व संबंधितांशी पत्रव्यवहार करणे, बैठकांचे इतिवृत्त तयार करणे, समितीच्या कामकाजाअंतर्गत कामांचा वेळोवेळी प्रगती अहवाल शक्ति प्रदत्त समिती व कृती गटास सादर करणे इत्यादी कामे करावयाची आहेत. सदर समितीने RFP प्रारुप तपासून दि. १६ जुलै २०१८ पावेतो अहवाल सादर करावा.

दिपक म्हैसेकर

(डॉ. दिपक म्हैसेकर)
विभागीय आयुक्त
पुणे विभाग, पुणे
तथा
सदस्य सचिव, नमामि चंद्रभागा प्राधिकरण

प्रत :-

१) मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
२) मा. संचालक, राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (NEERI), नागपूर
३) मा. संचालक, कॉलेज ऑफ़ इंजिनिअरींग, पुणे
४) मा. डॉ. राजेश बिनीवाले, Senior Principal Scientist & Head, CTMD, NEERI, Nagpur
५) मा. श्री. प्रविण कोल्हे, अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ (प्रकल्प), पुणे
६) श्री. प्रशांत खांडकेकर, प्रादेशिक उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन शाखा
७) मा. श्री. हेरंबप्रसाद गंधे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे.